CNR NO.MHSO060004602011

**विशेष दिवाणी दावा क्र.१२९/२०११**

कमलाकर साळुंखे, वगैरे

**वि.**

बाबुराव जवळेकर, वगैरे

## निशाणी क्रमांक १८९ व २०६ वरील एकत्रीत आदेश

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.१८९ हा प्रतिवादी क्र.४ यांनी वादीस दि.१२.१०.२०१८ रोजीच्या न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अनोंदणीकृत साठेखत करार दस्त दाखल करण्याचा व तो जप्त (Impound) करुन अपुरे मुद्रांक शुल्क भरण्याकरिता जिल्हा मुद्रांक अधिकारी यांच्याकडे पाठविण्याचा आदेश मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्ज निशाणी क्र.२०६ हा वादीने दि.१६.१२.२००१ रोजीचे साठेखत हे नियमित फौजदारी खटला क्र.१७९/२००३ मध्ये पोलीसांमार्फत हस्ताक्षर तज्ञांकडे पाठविलेले असल्याने, त्या दस्ताची प्रमाणित प्रत जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्याकडे जप्त करण्यासाठी पाठविण्याकरिता दिलेला आहे.

२. दोन्ही बाजुंचे म्हणणे विचारात घेण्यात आले. प्रमाणित प्रत ही जप्त (Impound) करण्यासाठी पाठविणे कायदेशीर, मुळ दस्त अस्तित्वात असल्याने, नसले तरी सदरील दस्त हा वादी यांनी भरावे लागणारे अपुरे मुद्रांक शुल्क किती आहे याची आकारणी करण्याकरिता व त्या अनुषंगाने माहिती मिळण्याकरिता जिल्हा मुद्रांक अधिकारी यांच्याकडे पाठविणे उचित होईल. तसेच प्रतिवादी क्र.४ यांनी दाखल केलेला मा. सर्वोच्च न्यायालयाचा दिवाणी अपील क्र.२२४३/२००९ मधील न्यायनिर्णय पाहता सदरील साठेखत/इसार पावती जप्तीची कार्यवाही करण्यासाठी संबंधित न्यायालयाकडुन मागविणे उचित होईल. सदरील दस्त जप्त (Impound) केल्यानंतर त्याची प्रमाणित प्रत या प्रकरणात ठेवुन मुळ दस्त हा पुन्हा फौजदारी न्यायालयाकडे फौजदारी प्रकरणातील कार्यवाहीसाठी पाठविणे योग्य होईल. उपरोक्त बाब अनुसरल्यास हे प्रकरण तसेच

फौजदारी प्रकरण चालविण्यात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. करिता, दोन्ही अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतात. करिता, खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतात.

अ. साठेखत/इसार पावती याची प्रमाणित प्रत जिल्हा मुद्रांक अधिकारी यांच्याकडे पाठवून अपुऱ्या मुद्रांक शुल्काविषयी अहवाल मागविण्यात यावा.

२. संबंधित लिपिकास निर्देश देण्यात येतात की, सदरील दस्त सिलबंद लिफाफ्यात त्यावर या न्यायालयाचे पत्र लावुन संबंधित लिफाफा पत्रासह जिल्हा मुद्रांक अधिकाऱ्याकडे दाखल करण्यासाठी व जिल्हा मुद्रांक अधिकारी यांचा अहवाल या न्यायालयात मागविण्यासाठी वादीकडे देण्यात यावा. त्याकरिता वादीने पुर्तता अहवाल दाखल करण्याविषयी हमी द्यावी.

३. नियमित फौजदारी खटला क्र.१७९/२००३ मध्ये दाखल असलेले दि. १६.१२.२००१ रोजीचे साठेखत जप्त करणेकामी या न्यायालयात सिलबंद लिफाफ्यात पाठविण्याविषयी संबंधित न्यायालयास पत्र देण्यात यावे.

४. सिलबंद लिफाफ्यात प्राप्त झालेला दस्त न्यायालयाच्या अभिलेखावर ठेवण्यात येवुन त्या संदर्भात कराव्या लागणाऱ्या जप्तीच्या प्रक्रिये संदर्भात पुढील आदेश पारित करण्यात येईल.

५. मुळ अभिलेख जप्तीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याची प्रमाणित प्रत या अभिलेखात ठेवण्यात येवुन मुळ अभिलेख पुन्हा सिलबंद लिफाफ्यात संबंधित न्यायालयास प्रलंबित प्रकरणातील अभिलेखात ठेवण्याकरिता पाठविण्यात यावा.

६. वादीने उपरोक्त बाबींची काटेकोर पुर्तता करावी. तसेच ज्या न्यायालयात फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे त्याची माहिती न्यायालयात सादर करावी.

७. संबंधित शिरस्तेदाराने या आदेशातील सुचनांचे काटेकोर पालन करावे जेणे करुन मुळ दस्ताबाबत योग्य ती कार्यवाही होईल.

NILESH SUBHASH BUDRUK Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK Date: 2025.06.24 12:57:07 +0530

(नीलेश सु. बुद्रुक)

दि. २१.०६.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 21.06.2025 |
| (d) | Uploaded on | : | 24.06.2025 |